जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

बुधवार दि.२८ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com



# समता वैश्विक होण्यासाठी वंजारी साहित्यिकांनी लेखणी कृती रूप करावी-संमेलनाध्यक्षा प्रा.डॉ.संगीता घुगे











**समाज आणि देश सशक्तीकरणात साहित्यिकांचा सहभाग पूर्वापार राहिला आहे या सशक्तीकरणाचे मूळ हे समतेत असून वर्तमानासह उज्वल भविष्याला समतेचा मंत्र गरजेचा व आवश्यक झालाय.म्हणूनच वंजारी समाजाचे हे प्रस्तुत चे साहित्य संमेलन आयोजनाचे दमदार पाऊल आहे .ही सकारात्मकता प्रतिभावंतांनी समाजमनात पेरण्यासाठी आपली लेखणी परजावी असे आवाहन प्रा.डॉ.संगीता घुगे यांनी उपस्थित समाज बांधवांसमोर केले त्या वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य आयोजित दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन अहिल्यानगर येथे उपस्थित जनसमुदायासमोर संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून बोलत होत्या. याप्रसंगी वाङ्मय इतिहासाचे संदर्भ उलगडत त्यांनी समाज साहित्य वाटचालीचा परामर्श घेताना सन २०२२ या वर्षी नाशिक येथे सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वंजारी समाजाच्या पहिल्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाची झालेली मुहूर्तमेढ किती योग्य व आवश्यक होती असे कथन करीत समाजातले प्रतिभावंत या निमित्ताने एका व्यासपीठावर येऊ लागलेत व समाजासह साहित्यिकही या निमित्ताने अधोरेखित होऊ लागलेत याचे समाधान नोंदवित महासंघाचे अध्यक्ष प्रबोधनकार तथा सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गणेश खाडे यांना संमेलन अध्यक्षांनी कृतज्ञतापूर्वक धन्यवाद दिलेत.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर। प्रतिनिधी**

या संमेलनाचे उद्घाटक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य माननीय प्रा.डॉ.गजाननराव सानप यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणातून समाजातील प्रतिभावंतांचे मनापासून कौतुक व अभिनंदन केले संमेलन व्यासपीठ प्रज्ञावंतांचा प्रेरणा स्रोत झाल्याशिवाय राहणार नाही अशा व्यासपीठाची आवश्यकता होती ती महासंघाने पूर्णत्व असलेल्याचे मनस्वी समाधान व्यक्त करीत मी आपल्या सोबतच सदैव आहे अशी ग्वाही दिली. उद्घाटन समारंभामध्ये अहिल्यानगरचे लोकप्रिय आमदार तथा संमेलनाचे प्रमुख अतिथी माननीय संग्राम भैया जगताप यांनी साहित्यातून समाजाची जडणघडण होऊन वैचारिक क्रांती घडते असे सांगत संत भगवान बाबा यांचे विचार समतेचा पुरस्कार करणारे होते त्यांनी केलेले प्रबोधन समाजाच्या कामी आले दऱ्याखोऱ्यात राहणारा समाज शिक्षण प्रवाहात आला आणि उच्चशिक्षित व प्रज्ञावंत झाल्याचे नोंदवित बाबांच्या तात्विकतेला कृतज्ञ वंदन करीत संमेलनाला भरभरून शुभेच्छा दिल्या.

तर संमेलनाचे स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि विजेता राजकुमार आघाव यांनी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून समाजऋण फेडता आल्याचा आनंद व्यक्त करीत संत भगवान बाबांच्या तपसाधनेला यानिमित्ताने अभिवादन करण्याची ही संधी मला मिळाली सकारात्मकता समता या गोष्टी समाजाला चिरंजीव करतात बळकटी देतात ओळख देतात त्या ओळखीचा भाग होण्याचे भाग्य मला वंजारी महासंघाने दिल्याची कृतज्ञता आपल्या मनोगतातून त्यांनी व्यक्त केली.

संमेलनाचे निमंत्रक मल्हारी खेडकर यांनी उपस्थित सर्व साहित्यिकांना अहिल्यानगरीत आणण्याचे व त्यांना ऐकण्याचे स्वप्न आज रोजी पूर्ण झाल्याचा आनंद नोंदवीत यापुढेही अशा सकारात्मक जाणीवांना पेलण्याची संधी मिळावी ती समर्थपणे पेलू असे आश्वासन मनोगतातून उपस्थितांसमोर मांडले.

संमेलनाचे सर्वेसर्वा अर्थात वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. गणेशजी खाडे यांनी आपल्या मनोगतातून सुसंस्कृत समाज सामाजिक समतेला बळकटी देऊ शकतो व त्यासाठीच विख्यात तत्वज्ञानी राष्ट्रसंत भगवान बाबांच्या तत्त्वज्ञानाचा ठाई ठाई अनुनय करण्याचे व समाज समृद्ध करण्याचे विनम्र आवाहनही चिंतनपूर्वक मांडले.

याच उद्घाटन सोहळ्यामध्ये पुरस्कार वितरण सोहळा म्हणजे लिहित्या हातांचा व मनांचा यथोचित गौरव करण्यात आला साहित्यिकां समवेत पत्रकारांना सन्माननीय अतिथींकडून सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.त्यात महाराष्ट्रातून आपल्या लेखन सामर्थ्याने सर्वश्रुत झालेले साहित्यिक छत्रपती संभाजी नगर येथून डॉ. शिवाजीराव हुसे अकोला येथून डॉ. शिवाजीराव नागरे परभणी येथून डॉ. विठ्ठल जायभाये पुणे येथून डॉ. चंद्रकांत धस मुंबई येथून श्रीमती रेखा शेळके संख्ये छत्रपती संभाजीनगर येथून डॉ. रामकिशन दहिफळे बीड येथून डॉ. द्वारका मुंडे तर सातारा येथून श्रीमती रंजना सानप चाळीसगाव येथून मनोहर ना आंधळे छत्रपती संभाजीनगर येथून सौ. अलकनंदा आंधळे अकोला येथून तुळशीराम बोबडे मुंबई येथून रमेश आव्हाड पुणे येथून सौ. प्रीती बेटकर जालना येथून श्रीमती छाया जायभाये यांचा सहभाग होता.

तर लोकशाहीचा चौथा खांब म्हणून ज्यांची लेखणी अहोरात्र समाज व्यवस्थेला बळ देत आली आहे अशा पत्रकारितेचा अर्थात पत्रकारांचा सन्मानही संमेलनाने मनस्वी जपला त्यात प्रामुख्याने दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बाळासाहेब फड दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवंत दैनिक अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे वंजारी पुकारचे संपादक दत्ता जायभाये दैनिक लक्ष्यराजचे संपादक निलेश पुराणीक व साहित्य दर्पण चे संपादक गुलाब राजा फुलमाळी या सर्व पत्रकारांना मान्यवर अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह व शाल देऊन गौरवण्यात आले.

संपूर्ण दिवसभर चाललेल्या या साहित्य सोहळ्यात दुसऱ्या सत्रात परिसंवादाने जणू चैतन्याची धुवाधार बरसातच केली त्यात परिसंवाद सत्राचे अध्यक्ष अकोला येथील डॉ. शिवाजीराव नागरे यांनी सामाजिक समता व सुसंस्कृत समाज या घटकांचे केलेले बहुआयामी विवेचन श्रोत्यांच्या मनाला गवसणी घालून गेले. तर सहभागी वक्ते डॉ.शिवाजीराव हुसे यांनी सामाजिक समता या घटकाला अनेक दृष्टांत आणि दाखल्यांनी समृद्ध करीत केलेले अभ्यासपूर्ण भाष्य रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवून गेले .प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे यांच्यातला संशोधक व समीक्षक त्यांच्या व्याख्यानातून सदर विषयाला यथोचित न्याय देत गेल्याचे समाधान श्रोत्यांना झाले. ते छत्रपती संभाजीनगर येथून आले होते. तर परभणी येथील ह .भ.प.प्रा विठ्ठल जायभाये यांनी ज्ञानेश्वरी व तुकोबांच्या अभंग ओव्यांच्या संदर्भातून श्रोत्यांना चांगलेच मंत्रमुग्ध करीत समतेच्या अधिष्ठानाचे ययथोचित मर्म आणि महत्त्व विशद केले.

मुंबई येथून आलेल्या वक्त्या श्रीमती रेखा शेळके संख्ये यांनी सामाजिक समतेची सुरुवात स्त्री पुरुष समानतेपासून व्हावी असे विधान करीत स्त्रियांनी वर्तमानकाळी घेतलेल्या गगनभरारीचे सम्यक दर्शन आपल्या सुबोध मांडणीतून श्रोत्यांना घडविले .तर सौ प्रीती बेटकर या पुण्याहून आलेल्या वक्त्या यांनी समतेचे अधिष्ठाते संत भगवान बाबा यांच्या जीवन प्रवासातून समतेच्या चिंतनशीलतेवर चांगलाच प्रकाश टाकला.

तिसऱ्या सत्रात कथाकथनाचा श्रवणप्रिय समारंभ सुरू झाला कथाकथन सत्राचे अध्यक्ष अकोला येथून आलेले तुळशीराम बोबडे यांनी सूत्र स्वीकारित कथाकथन समारंभास सुरुवात केली. यात छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या सौ अलकनंदा आंधळे यांनी अर्धा कोयता ही स्त्री सामर्थ्याचे दर्शन घडवणारी व श्रोत्यांच्या अंगावर शहारे आणणारी कथा दमदारपणे सादर केली.तर सातारा येथील कथा लेखिका सौ रंजना सानप यांनी पत्र नावाची वास्तववादी कथा सांगून शिक्षणाला वयाचे बंधन नसते .पाहिजे फक्त प्रचंड इच्छाशक्ती व याच बळावर वार्धक्याकडे वाटचाल करणारी निरक्षर स्त्री ज्ञानेश्वरीचं वाचन करण्याची धम्मक सिद्धीला नेते. हे सांगत श्रोत्यांची दाद मिळवून गेली. यानंतर सौ नीता सानप घुले यांनी ऊसतोड कामगारांच्या स्त्री जीवनावर तसेच समाज व्यवस्थेच्या निष्ठुरपणावर भाष्य करीत विचारगर्भ अशा कथेची मांडणी श्रोत्यांच्या डोळ्यात अंजन घालून गेली. तर बबनराव महामुने यांनी आपल्या वैदर्भि शैलीने सादर केलेल्या कथेने श्रोत्यांमध्ये आनंद लहरीं मनसोक्तपणे पसरवल्यात. कथाकथन सत्राचे अध्यक्ष यांनी कथा कशी आटोपशीर असावी व कथेचे पारंपारिक वैभव सांगत आपल्या विनोदी शैलीने मांडलेली बाहुलीची कथा सादर केली. भाग्य हे सर्वांच्याच नशिबी फळफळत नाही हे खुमासदार शैलीने कथन करीत श्रोत्यांच्या टाळ्या मिळवल्या.

चौथ्या आणि शेवटच्या सत्रात कवी संमेलनाचे अध्यक्ष खानदेश कवी मनोहर ना आंधळे यांनी काव्य महात्म्य थोडक्यात मांडून कवी संमेलनाची मशाल धगधगत्या शब्दांनी पेटवली यात सौ छाया जायभाये यांनी कलियुग या शीर्षकाची कविता सादर करीत माणसातलं माणूसपण जागृत केलं व श्रोत्यांच्या बुद्धीलाच या कवितेने आवाहन केले डॉ. चंद्रकांत धस यांनी आपल्या गोड गळ्यातून तुझी पुण्याई या शीर्षकाची कविता सादर करीत आईच्या आठवणी श्रोत्यांच्या हृदयापर्यंत नेल्या. तर गुलाब राजा फुलमाळी या अष्टपैलू कवीने तुझ्या कुंकवात माय मले दिसते पंढरी ही दमदार कविता सादर करीत संमेलनात रंगत आणली कवी संमेलनाचे अध्यक्ष मनोहर आंधळे यांनी बुरखाच फाड बाई ही गझल सादर करीत समाज व्यवस्थेचा बुरखाच फाडून टाकण्याचे कौशल्य आपल्या अंगी असलेल्या शब्द सामर्थ्याने निर्माण केले. तर सुनीताताई कपाळे यांनी बाप नावाची कविता सादर करीत बापाच्या आभाळ उंचीला गवसणी घालत श्रोत्यांच्या अश्रूंचे बांध फोडलेत.संमेलनाचे मावळते अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांना व्यासपीठावरील व श्रोत्यांमधील रसिकांनी स्नेहाग्रहाने कविता म्हणण्यास भाग पाडले.प्रा. आंधळे यांनी विडंबनाकडे जाणारी व वास्तवाचे दर्शन घडवणारी कर कविता या शीर्षकाची कविता सादर करीत श्रोत्यांना खळखळून हसवलेच पण रंजना सोबतच अंजन घालणाऱ्या या कवितेने जाणकारांची उत्स्फूर्त दादही मिळवली. डॉ. विजयकुमार कस्तुरे या जेष्ठ कवींनी चल सखे बोलू काही ही प्रेम कविता सादर करीत श्रोत्यांची मनसोक्त दाद मिळवली तर प्रीती कायंदे या बालकवयित्रीने स्वप्न माझे ही बाल सुलभ पण मनाला भिडणारी कविता सादर करीत काव्य संमेलनाची सांगता करण्यात आली.संपूर्ण संमेलनाचं बहारदार सूत्रसंचालन खानदेशातील सुप्रसिद्ध कवी तथा अभ्यासक्रमातील कवी श्री मनोहर आंधळे यांनी खास वाङ्मयीन शैलीच्या साह्याने केल्यामुळे श्रोतावर्ग दिवसभर व्यासपीठांसमोर खिळून राहिला.

ग्रंथदिंडी बैठक व्यवस्था व्यासपीठ उभारणी अतिथी स्वागत सुरुची भोजन सन्मान चिन्हांचे वितरण या साऱ्यांची चोख अंमलबजावणी नजरेत भरणारी व मनाला भारणारी होती.संमेलनाचा,आयोजकांसह सहभाग नोंदवणाऱ्या प्रत्येकास झालेला आनंद हा शब्दात निश्चितच सामावणारा नक्कीच नाही सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत चाललेल्या या संमेलनातून समाज मनापर्यंत पोहोचण्याचे समाधान महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश खाडे यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केले.





## वंजारी महासंघाकडून ज्ञानेश्वर बुधवत यांना

# राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान





लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लॉन्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे नुकतेच उत्साहात संप्पन्न झाले.या संमेलनासाठी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे तर उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, मावळते अध्यक्ष प्रा. वा. ना. आंधळे हे उपस्थित होते. वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष विचारवंत गणेशजी खाडे,स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सहस्वागताध्यक्ष रेणुका वराडे अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.या संमेलनात दैनिक लोकनेताचे संपादक, ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

ज्ञानेश्वर बुधवत मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील सावखेड तेजन या खेडे गावातले असून ज्ञानेश्वर बुधवत यांच्या निर्भिड व निःपक्षपाती पत्रकारिता या सर्व कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ' राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ ' लेखक, संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे ज्ञानेश्वर बुधवत यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

केलेला गौरव हा केवळ माझा नसून मला घडवणारे प. पू. बाबा, माझ्या सोबत नेहमी एकमत राहून मला बघून घेऊ काय ते, अशी रोखठोक भूमिका घेणारे नेहमी सोबत असणारे माझे बंधू ज्ञानेश्वरजी मुंढे, मला नेहमी कुठेही जाण्यासाठी कधीही नाही म्हणारा माझा परिवार माझे आई वडील आजी भाऊ, व परिवारातील सर्व, पुरस्कार ज्या व्यासपीठांमुळे मिळाला तो दैनिक लोकनेता परिवार ज्यांनी नेहमी आपल्या संपादकाला आणि पेपर महाराष्ट्र भर पोहचवण्यासाठी प्रयत्न केलेत. त्यानंतर महत्वाचे नाव जे केवळ एक रसिक म्हणून, आपल्या मित्राला मिळत असलेल्या पुरस्कार एकट्याने काय घ्यावा म्हणून कोणी तरी २ मित्र सोबत पाहिजे म्हणजे त्यांनी गावात जाऊन सांगितले पाहिजे की इतका चांगला सत्कार झाला म्हणून, तब्बल पावणे ३०० किमी आलेले माझे गुरुवर्य मार्गदर्शक तथा लोकनेता चे मानद सल्लागार ड. विजयकुमार कस्तुरे साहेब चिखलीकर,कलाकार बबनराव महमुने व अंकुशराव पडघान, व मला शाळेय जीवनापासून योग्य मार्गदर्शन करत आलेले. प्रा. संदीप सर ज्यांनी मला नेहमी छोटाभावा प्रमाणे मार्गदर्शन केले. आणि... जीवन जगत असतांना आयुष्याचे जे साथीदार वेगवेगळ्या क्षेत्रातून आणि वेगवेगळ्या ठिकाणाहून मिळत गेले तो मित्रपरिवार व इतर सर्व आदी. मान्यवर या सर्वांचे मनःपुर्वक आभार व्यक्त करून सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो. असे प्रतिपादन संपादक बुधवत यांनी माध्यमांशी बोलतांना केले.

## पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांच्या कामाची झलक

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला केले एकच तासात जेरबंद




लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

दि २३ ऑगस्ट रोजी दुपारी श्रीगोंदा तालुक्यातील एका गावात फिर्यादी हे त्यांचे घरी असतांना त्यांचेच गावातील आरोपी दत्ता बाळु शिंदे, वय ३० वर्ष, ता. श्रीगोंदा हा फिर्यादी यांचे घरी दारुचे नशेत आला व आरडा ओरड करुन त्याने त्याच्या स्वतः च्या अंगावरील कपडे घराच्या पढवीत काढुन फिर्यादी यांचे घरात प्रवेश करुन अल्पवयीन मुलीला लज्जा उत्पन्न
होईल असे कृत्य करुन विनयभंग केल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यात घडली. या घटनेचा तपास करत श्रीगोंदा पोलिसांनी एका तासातच आरोपीस ताब्यात घेतले.

सविस्तर माहिती अशी की घटना घडल्या नंतर फिर्यादी यांनी २३ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री फिर्याद दिल्यानंतर श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये येथे भारतीय न्याय संहिता कलम ३३३, ३४ सह बालाकांचे लैगिंक अपराधापासुन सरंक्षण अधिनियम ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल
झाले नंतर श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोनि. किरण शिंदे यांनी घटनेची गांभीर्याने दखल घेवुन तात्काळ आरोपीस अटक करण्यासाठी दोन पथके रवाना करुन आरोपीस तात्काळ अटक करणेचे आदेश दिले पोलीसांनी सदर घटनेतील आरोपी याचा भावडी व कोकणगाव परिसरात शोध घेत असतांना सदर आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत विभाग विवेकानंद वाखारे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. किरण शिंदे, पोसई. संपत कन्हेरे, पोना गोकुल इंगवले
पोना./ संग्राम जाधव, पोकॉ./ संदिप राऊत, पोकॉ. अरुण पवार पोकॉ. संदिप आजबे, पोकॉ. आनंद मैड यांनी केली आहे. सदर आरोपीस मा.न्यायालय श्रीगोंदा यांचे समोर हजर केले असता आरोपीस सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे . सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. पोलीस अधिक्षक अहमदनगर आणि अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर, पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोसई. संपत कन्हेरे हे करीत आहेत.

# श्री क्षेत्र उमरज येथुन अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

## परमानंदाची प्राप्ती म्हणजे मोक्ष-संत एकनाथ महाराज

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



हिंदु धर्मानुसार मनुष्याचे चार पुरुषार्थ आहेत.त्यात धर्म,अर्थ,कर्म आणि मोक्ष यांचा समावेश आहे.मनुष्य जिवनाचे सार्थक व्हावे असे वाटत असेल तर मोक्षप्राप्ती होणे आवश्यक आहे.जीवनातील दुःखाची निवृत्ती आणि परमानंदाची प्राप्ती म्हणजे मोक्ष होय.मोक्षप्राप्तीसाठी वेगवेगळे मार्ग आहेत.त्यासाठी मानवाने योग्य व समाजोपयोगी कार्य करणे आवश्यक आहे.असे संत एकनाथ गुरु नामदेव महाराज यांनी सप्ताहाच्या काल्याच्या किर्तनातून आपल्या भक्तगणांना संबोधीत केले.

श्री क्षेत्र उमरज येथे दि.२० ऑगस्ट पासून श्रीकृष्ण जन्मोत्सव व संत नामदेव महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.दि.२७ रोजी या सप्ताहाची सांगता संत एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाचे झाली.यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती अरुणा संगेवार,प्रविण पा.चिखलीकर,संजय पवार,भगवान राठोड,उमरज, दगडसांगवी,बोरी,पाताळगंगा, घागरदरा,पानशेवडी आनंदवाडी गावांसह पंचक्रोशितील मृदंगाचार्य, टाळकरी,विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते,जिल्ह्यासह राज्यातील व शेजारी राज्यातील भक्तगण उपस्थित होते.

आपल्या मधुर वाणीतून भक्तगणांना संबोधीत करत असतांनाच एकनाथ महाराज म्हणाले की,जगात वारकरी एकमेव असा समुदाय आहे की,या समुहात कधीच जात-पात मानली जात नाही.सोबतच या समुदायात गरीब-श्रीमंत असा भेद भावही मानला जात नाही. समाजसुधारणा करण्याचे काम सोबतच मानवीचे कल्याण कसे साधावे याचाच विचार केला जातो.संतांची परंपरिआच आहे की,मानवच नाही कोणत्याही जिवास हानी पोहचू देत नाही.म्हणून या समुदय सोबत येण्याचे आवाहन यावेळी आपल्या भक्तगणांना केले.धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्याचा वसा चालवणारे संस्थानधाकटे पंढरपुर म्हणून ओळखले जाणारे उमरज येथील सौत नामदेव महाराज मठसंस्थान हे धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्याचा वसि चालवित असते.यामध्ये प्रामुख्याने दरवर्षी आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या काळात आरोग्य तपासणी शिबीर,रक्तदान शिबीर असे कार्यक्रम आयोजित केले जाते.यावर्षी मोफत आरोग्य शिबिरात सुमारे १ हजार २०० जणांच्या आरोग्याची तपासणी करुन मोफत औषधी देण्यात आली.तर या दरम्यान रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात ४ महिलांसह १२६ जणांनी रक्तदान केले.

# लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत वारूळवाडी व राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील बहुसंख्येने मान्यवर उपस्थित होते.

मा..प्राचार्य पांडुरंग गायकवाड ,मा शिवाजी राजगुरू (उपाध्यक्ष,आद्यगुरू लहुजी वस्ताद साळवे शासकीय स्मारक समिती),मा.राजेंद्रभाऊ मेहेर (सरपंच,वारूळवाडी ग्रामपंचायत), मा.दिपकभाऊ बाळसराफ (सरपंच,सावरगांव ग्रामपंचायत), मा..दातखिळे साहेब (सरपंच,दातखिळेवाडी ग्रामपंचायत), मा..भावेश डोंगरे (सरपंच,आर्वी ग्रामपंचायत),मा.जुबेर शेख (अध्यक्ष, राजे पतसंस्था),मा..संतोष डोके (तालुकाध्यक्ष,शिवसेना आंबेगाव तालुका), मा.मिनाक्षीताई खरात (उपाध्यक्ष,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कारार्थी फाऊंडेशन), प्रसिद्ध बैलगाडामालक मा..एकनाथ कसबे, मा.बाबाजी कोरडे (तमाशा अभ्यासक), मा..दादाभाऊ आल्हाट (सेवानिवृत्त मुख्याध्यापक),मा वसंतराव लोंढे (सेवानिवृत्त वनाधिकारी),. मा.काशिनाथ आल्हाट (संस्थापक/अध्यक्ष,हलगीसम्राट केरबा पाटील फाऊंडेशन)* आदी मान्यवर उपस्थित होते . या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाहीर ठकसेन शिंदे यांच्या शाहिरी



गाण्यांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रसिद्ध गायिका व लावणीसम्राज्ञी सौ.सीमा पोटे, प्रसिद्ध गायिका व तमाशासम्राज्ञी रेणुका खुडे, प्रसिद्ध गायिका सौ.गायत्री शेलार, प्रसिद्ध गायिका सौ.अनुराधा खंडे, प्रसिद्ध गायिका सौ.शारदा गावडे, प्रसिद्ध गायिका व तमाशासम्राज्ञी सौ.नंदा भोकटे, प्रसिद्ध गायिका व लावणीसम्राज्ञी मिराबाई दळवी आदी कलाकारांनी अण्णाभाऊं साठे यांच्या जीवनावर गाणी सादर केली.

तमाशा फड मालक किरणकुमार ढवळपुरीकर , विनोदसम्राट सुधाकर पोटे, फॉरेन रिटर्न गायक संजय फल्ले, तमाशासम्राट कैलास नारायणगावकर, तमाशासम्राट महादेव खुडे , तमाशासम्राट राजेश नारायणगावकर, प्रसिद्ध ढोलकीसम्राट शैलेश भंडारे,तमाशा फड मालक संजय महाडिक, प्रसिद्ध वादक निलेश भंडारे, प्रसिद्ध वादक भालचंद्र पोटे आदी गुणवंत कलावंत उपस्थित होते.तसेच प्रसिद्ध ढोलकीसम्राट पमाजी पंचरास लोणीकर व वाजंत्री ताफा, प्रसिद्ध सनईसम्राट दादाभाऊ आल्हाट घोडेगावकर व वाजंत्री ताफा* या वादन संचांनी पारंपारिक वादन करून आण्णाभाऊंना अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे

मा.प्राचार्य डॉ पांडुरंग गायकवाड म्हणाले, संघर्षा शिवाय माणूस मोठा होत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपले सर्व महामानव महामानव छत्रपती शिवाजी महाराज ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,महात्मा ज्योतिराव फुले, लहुजी वस्ताद साळवे ,अण्णाभाऊ साठे ,राजश्री शाहू महाराज, सावित्रीबाई फुले.या महामानवांचे विचार आपण अंगीकृत केले पाहिजेत.आपण परिस्थितीचा आभास निर्माण करून आपण आपला विकास थांबवतो .साहित्य अण्णाभाऊ साठे यांनी परिस्थितीवरती मात केली. म्हणूनच त्यांची जयंती आपण साजरी करत आहोत.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने *मा..नवनाथशेठ भागवत(नवउद्योजक पुरस्कार),मा..अमोल अंकुश(सामाजिक योगदान पुरस्कार),मा..नरेश पंचरास(सनई सम्राट पुरस्कार),मा..शाहीर ठकसेन शिंदे(शाहिरी पुरस्कार),मा.दादाभाऊ आल्हाट(सनई सम्राट पुरस्कार),.सौ.गायत्री शेलार(गुणवंत गायिका पुरस्कार),धर्मवीर संभाजी नागरी पतसंस्था (आदर्श नागरी पतसंस्था पुरस्कार),मा..नंदकुमार नेटके(उत्कृष्ट गायक पुरस्कार),मा.रामदास भोईर(उत्कृष्ट ग्राहक सेवा पुरस्कार),मा.राजेंद्रभाऊ मेहेर(आदर्श सरपंच पुरस्कार),मा.सौ.अनिता शिंदे(आदर्श शिक्षणाधिकारी),

मा..कैलास सावंत नारायणगावकर(गुणवंत तमाशा कलावंत पुरस्कार),मा.जनार्दन वायदंडे(ढोलकीसम्राट पुरस्कार),मा.शकिलभाई मणियार(आदर्श पत्रकारिता पुरस्कार),मा.भगवान काशिद(आदर्श शिक्षक पुरस्कार),मा..शांताराम डोंगरे(आदर्श शिक्षक पुरस्कार),मा.सौ.पुनम हांडे(आदर्श शिक्षक पुरस्कार),मा.विष्णू धोंडगे(आदर्श अधिकारी पुरस्कार),मा.आशिष दुर्गे(सामाजिक योगदान पुरस्कार)* प्रशांत भूजबळ लिपिक पुरस्कार आदी मान्यवरांना अण्णाभाऊ साठे पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.उपस्थित महिलांना भेट म्हणून बहिण लाडाची, साडी सन्मानाची वितरण करण्यात आली. चविष्ट भोजन सभारंभाने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाच्या निमित्ताने शाहीर लक्ष्मण लोखंडे , हलगीसम्राट एकनाथ आल्हाट,.सुनील आल्हाट, महादेव खुडे, मनोहर वायकर सर.मेहबूब काझी सर, संदिप थोरात सर,अनिल शिंदे,अनिल खुडे,विशाल शेलार,सचिन लोखंडे,राजकुमार भालेराव सर,संतोष पंचरास आदी समाजबांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे संचालक साईनाथ कनिंगध्वज सर व आभार सचिव अमित आल्हाट यांनी केले.

# सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदु समजुन आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या-ना.संजय बनसोडे

## सामान्य रूग्णालयातील रिक्त पदाचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**





उदगीर येथे लातूर जिल्ह्याच्या नंतर आपले उदगीर शहर हे सर्वात मोठे असून उदगीर तालुक्यासह शहर व आजूबाजूच्या गावातील गोर - गरीब रुग्ण मोठ्या संख्येने या सामान्य रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येत असतात आता विविध आजारावरील औषधासोबत सोनोग्राफी व एक्सरे सुविधा उपलब्ध असुन या सर्व सामान्य रुग्णांवर योग्य उपचार करून त्यांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन त्यांना उत्तम आरोग्याची सेवा द्या असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील सामान्य रुग्णालयात नव्याने उभारण्यात आलेल्या बाह्यरुग्ण (ओपीडी) इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, राहुल केंद्रे, बसवराज पाटील कौळखेडकर, रामराव बिरादार, रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर , प्रदीप ढेले, एम. एम पाटील, विकास जाधव, भरत चामले , समीर शेख, प्रवीण भोळे, बालाजी भोसले, शिवशंकर धुपे, श्याम डावळे, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, सुधीर भोसले, मनोज पुदाले, प्रकाश राठोड, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, रंजना चिघळे, अँड.वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, रमेश शेरीकर, बसवराज रोडगे, गिरीष उप्परबावडे, गणेश गायकवाड, मुकेश भालेराव, संघशक्ती बलांडे, प्रदीप जोंधळे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, सामान्य रूग्णालयात गेल्या अनेक वर्षापासुन रूग्णांना अडचण होत असल्याचे आपल्या निर्दशनास आल्याने २ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देवून या बाह्य रूग्ण विभागाची इमारत बांधली आहे. आता यापुढे कुठलाही रुग्ण आरोग्य सेवेपासुन वंचित राहणार नाही. भविष्याय वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या कामाचा ताण लक्षात घेवुन या सामान्य रूग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार असुन मतदार संघतील रूग्णांना पहिल्या आमदार फंडातुन १२ रुगणवाहिका उपलब्ध करुन दिल्या. या रुगणवाहिकेचा लाभ अनेक गरजू रूग्णांना होत आहे.या इमारतीत असंसर्गजन्य रोग तपासणी विभाग, पुरुष वैद्यकीय विभाग व आयुष विभाग, स्त्री वैद्यकीय विभाग, शल्य चिकित्सा, कान - नाक - घसा विभाग, आदी विभाग रुग्णांच्या सेवेत सुरु करण्यात आले आहेत. या सामान्य रुग्णालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागासह सर्व जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यात येणार आहे. मागील काळात आपण आपल्या मतदार संघातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून गुडसुर, घोणसी, मंगरूळ, कौळखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले तर वाढवणा बु. येथे विशेष बाब म्हणून १५ कोटीचे ग्रामीण रूग्णालय उभारल्याने आता आपल्या भागातील रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न मिटणार आहे. भविष्यात उदगीर येथे मेडिकल कॉलेज उभारणार असल्याचा आपला माणस असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.या कार्यक्रमास सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व उदगीर शहर परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मा.मंत्री सुबोधभाऊ सावजी डॉ.गोपाल बछिरेंचे नगरपालिकेत ठीया आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



मेहकर नगरपालिकेच्या चापलुसी कारभारामुळे लोक त्रस्त आहेत माजी मंत्री सुबोध भाऊ सावजी व डॉ. गोपाल बाछिरे यांनी नगरपालिका मुख्य अधिकारी यांच्या दालनातच ठीया आंदोलन करून मुख्याधिकाऱ्याला जाब विचारला.

नगरपालिका मेहकर हत्तीतील डीपी रोड वरील पथदिव्याचे खांब उठून फेकण्यात आले व एका लोकप्रतिनिधीचा तेथे आनंद उत्सव एक महिना पूर्वी साजरा करण्यात आला एक महिना होऊन सुद्धा सदरील खांब परत बसवण्यात आले नाही म्हणून काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सदरील घटनेची तक्रार केली होती जेव्हा आज नगरपालिकेत जाऊन माजी मंत्री सुबोध भाऊ सावजी व डॉ. गोपाल बछिरे यांनी ठिया आंदोलन करून नगरपालिकेचे मुख्य अधिकारी यांना जाब विचारला आपण कोणत्या अधिकारात वैयक्तिक कार्यक्रमासाठी डीपी रोडवरील खंबे काढून लोकप्रतिनिधीस आनंद उत्सव कार्यक्रमासाठी परवानगी दिली त्यावर मुख्याधिकाऱ्यांनी अद्याप सदरील रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्हाला हस्तांतरित केलेलं नाही असे उत्तर दिले त्यावर बछिरे यांनी जेव्हा तुमच्याकडे रस्ता हस्तांतरित झालाच नाही मग कुठल्या अधिकाऱ्याने त्या रस्त्यावर तुम्ही पथदिव्याचे खांब लावले तेव्हा मुख्याधिकारी गांगरून गेले त्यावर मुख्य अधिकाऱ्यांना डॉ. बछिरे यांनी तुम्ही राजकारण्यांचे घरगडी आहात का असा प्रश्न केला सर्वसामान्यांच्या टॅक्स रुपी भरलेल्या रकमेतून तुम्हाला पगार मिळतो मग तुम्ही राजकारण्यांचे घरगडी म्हणून का काम करता आपला व्यवहार सुधरून घ्या सर्वसामान्यांची जनतेचे काम करा अन्यथा जनतेस याचा हिशोब द्यावा लागेल असा दम माजी मंत्री सुबोधभाऊ सावजी यांनी मुख्याधिकारी यांना दिला मुख्याधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधी यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याची प्रत व खुलासा लेखी स्वरुपात देऊन त्यानंतरच ठिय्या आंदोलन संपले याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोणार शहर प्रमुख गजानन जाधव युवा सेना शहरप्रमुख श्रीकांत मादनकर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष एड. मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## हर्षवर्धन पाटील युथ फाऊंडेशनच्या वतीने

# इंदापूर महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयातील क्रिडा संकुल या ठिकाणी हर्षवर्धन पाटील युथ फाऊंडेशनच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जिवन सरवदे यांच्या मार्गदर्शनानुसार उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे व विज्ञान विभाग प्रमुख डॉ.शिवाजी विर आणि मान्यवर युवकांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी युवक,युवती तसेच शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान केले.युवा नेते राजेंद्र पवार म्हणाले की,आमच्या सर्वांचे लाडके नेते हर्षवर्धन पाटील यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त हर्षवर्धन पाटील युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून तसेच युवा नेते राजवर्धन पाटील आणि अंकिता पाटील-ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सलग दुसऱ्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. युवा नेते बबलूभैय्या पठाण म्हणाले की,रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.दरवर्षी आम्ही हर्षवर्धन पाटील साहेबांच्या वाढदिवसानिमित्त असा विधायक उपक्रम राबवत असतो.यावेळी युवा नेते तुषार खराडे,सागर गानबोटे, अमोलराजे इंगळे,मयूर शिंदे,दत्तू पांढरे,दादा पिसे, बाळासाहेब भोंगळे,मयूर देवकर,अतुल वाघमोडे, अमोल राऊत,अजित करळे,बापू पारेकर यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा निमित्त विविध कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार येथे श्री राष्ट्रसंत शिरोमणी संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा दरवर्षी तिथीप्रमाणे यंदाही दि.३० ऑगस्ट रोजी कंधार येथे साजरी होणार आहे,

तरी या कार्यक्रमाला नाभिक समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान महाराष्ट्र नाभिक महामंडळ व समस्त समाज बांधवाकडून करण्यात आली आहे, श्रीराष्ट्रसंत शिरोमणी संत सेना महाराज त्यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित झाला,असून या कार्यक्रमांत दहावी बारावी व नवयुक्त कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचारी गुणवंतांचा सत्कार यासोबतच बालाजी मंदिर ते महाराणा प्रताप चौक ते श्री संत नामदेव महाराज मंगल कार्यालय मार्ग संत सेना महाराज नगर कंधार येथे मिरवणूक तसेच या निमित्त झी टॉकीज फेम ह.भ.प नारायण महाराज शास्त्री केंद्रे कीर्तनाचा कार्यक्रम असून या कार्यक्रमाला समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ व समस्त समाज बांधव यांच्याकडून करण्यात आला आहे.

# अखेर तारामतीताई जायभाये यांच्या उपोषणाला यश ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाईसाठि पत्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



अखेर गट विकास अधिकारी पंचायत समिती लोणार यांनी काढले वढव गट ग्रामपंचायत कोलखेड ग्राम विकास अधिकारी दांडगे यांच्यावर कारवाई साठी पत्र... वढव गट ग्रामपंचायत सरपंच व ग्राम विकास अधिकारी हे आणि ठेकेदार यांनी संगतमताने सदस्य यांच्या परस्पर बिले काढल्याचे प्रकार समोर आल्यावर सर्व सदस्य यांनी ठेकेदार बदल्यांचा निर्णय ३०/०७/२०२४ रोजी सर्व समक्ष्य घेण्यात आला होता, त्या ठरावास सरपंच हे तयार नव्हते,ग्रामपंचायत मध्ये ठराव घेण्यात आला परंतु विना सही चा ग्रामविकास अधिकारी यांनी ठराव सरपंच पती कडे दिला,जेणे करून ठेकेदार तोच राहावा. आणि परस्पर पैसे काढता येईल पैसे काढल्याचे पुरावे सर्व सदस्य यांना मिळाल्या नंतर त्यांनी ठेकेदार यांना बदल्यांचे ठरले, या कारणास्तव सरपंच पती व ग्राम विकास अधिकारी १५ दिवस स्वतःकडे ठेवले व १५ऑगस्ट रोजी सरपंच पती यांनी ठराव ण देण्यासाठी वाद केले, नंतर ठरावावर सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांनी, ३ विरुद्ध ५ असे लिहून ठराव दिल्या.त्यामुळे सदस्या ग्रामपंचायत तारामती जायभाये यांनी पोलीस स्टेशन व गट विकास अधिकारी यांना तक्रार केल्या नंतर त्यांनी मी गावातील रस्ते व चिखल संबधित आमरण उपोषणास बसले असताना गट विकास अधिकारी यांनी ही कारवाई केली, व ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत दांडगे यांनी स्वतःलेखी कबूल केले, कि घडलेला प्रकार सरपंच पती हे ग्रामपंचायत मध्ये ढवळा ढवळ करत असल्याचे लेखी दिले असून हा प्रकार खरा असल्याचे ग्रामपंचायत ग्राम विकास अधिकारी यांनी लेखी दिले असल्यामुळे विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे सादर करणार असल्याचे तारामती जायभाये सदस्या यांनी कळवले, व लवकरच पदावरून पाय उतार होतील यात शन्का नाही.

# आज पिंपरी आष्टी येथे आ.आजबे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी आष्टी येथे आज मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचा पिंपरी आष्टी ग्रामस्थ व परिसरातील जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते शहादेव कोंडे यांनी केले आहे

आज मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी पिंपरी आष्टी येथे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या वाढदिवसानिमित्त सायंकाळी सात वाजता ह भ प दीपाताई खिळे महाराज यांचे भव्य कीर्तन सोहळा संपन्न होणार आहे तसेच सकाळी नऊ ते बारा या वेळेमध्ये एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय महंमदवाडी हडपसर पुणे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व आमदार बाळासाहेब आजबे काका मित्र मंडळ यांच्यावतीने भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिर व चष्मे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तसेच सकाळी आठ वाजता गावामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे आमदार बाळासाहेब आजबे यांचा २८ ऑगस्ट रोजी वाढदिवस असल्याने या विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले तरी या दोन्ही कार्यक्रमाचा पिंपरी ग्रामस्थ व परिसरातील जनतेनेही लाभ घ्यावा असे आवाहन शहादेव कोंडे यांनी केले आहे.

# इंजि.विश्वजीत गायकवाड फाउंडेशन मार्फत श्रावणी सोमवार निमित्त किल्ल्यात महाप्रसादाचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**



श्रावण सोमवार निमित्त येथील किल्ल्यातील उदागिर महाराज मंदिरात इंजि.विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशन मार्फत पहाटे अभिषेक करण्यात आला आणि दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .

श्रावण महिन्यातील चौथा सोमवार दि. २६ रोजी येथील प्रसिद्ध अशा उदागिर महाराज मंदिर येथील महादेवाला इंजि.विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशन चे अध्यक्ष विश्वजित गायकवाड यांच्या हस्ते अभिषेक आणि महाआरती करण्यात आली . दुपारी महाप्रसाद वाटप करण्यात आले .

श्रावण सोमवार असल्याने भाविक भक्तांनी किल्ल्यातील मंदिरात भल्या पहाटेपासून गर्दी केलेली होती . पहाटे आरती वेळी उपस्थित भक्तासोबत विश्वजीत गायकवाड यांनी महाआरती केली . यावेळी आशिष गुरधाळे,अक्षर जेवरीकर,विशाल हाळीकर,जय सोनावणे,अनिल मस्के,गौरव हनवंते,आकाश धोत्रे,अमर देडे,यश शिंदे,ऋषी लांडगे,सूर्यभान कांबळे,माधव सूर्यवंशी,वैभव गुप्ता,विराट हलीकर,युवराज शिंदे,आदित्य मादळे, अल्केश वाघमारे,विलास भंडे कुलदीप शिंदे, गोविंद कांबळे, संदेश गायकवाड यांच्यासह नागरिक उपस्थित होते .

# चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त कपर्दिकेश्वर मंदिरात तांदळाच्या कलात्मक पिंडी

## श्री.पांडुरंग नानाभाऊ डुंबरे यांना ओतूरभूषण पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

ओतुर । मयूर ढोबळे



महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र ओतूर (ता.जुन्नर) येथे चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त श्री कपर्दिकेश्वर मंदिरातील शिवलिंगावर तांदळाच्या कलात्मक चार पिंडी झाल्या या पिंडींचे लाखो भाविकांनी दर्शन घेतले असल्याची माहिती श्री कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे,राजेंद्र डुंबरे,पांडुरंग ढोबळे यांनी दिली.चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त कपर्दिकेश्वर मंदिराजवळील आखाड्यात महाराष्ट्रातील नामवंत मल्लांची हजेरी असते त्यांच्या कुस्त्या पाहण्यासाठी कुस्ती शौकिनांची गर्दी ओसंडून वाहून अगदी आखाड्यात मेळा भरलेला होता. शिवभक्तांच्या शुभहस्ते महाअभिषेक व आरती करण्यात आली आणि मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांसाठी प्रसादाचे वाटप कपर्दीकेश्वर व चैतन्य स्विमिंग वॉकिंग ग्रुपच्या वतीने करण्यात आले.तसेच शिवभक्तानच्या वतीने केळी वाटप, चिक्की वाटप करण्यात आले.चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त राम कृष्ण हरी नामाची दिंडी काढण्यात आली होती.कपर्दिकेश्वर देवस्थानला ऐतिहासिक महत्व असल्याने येथे दरवर्षी भाविंकांची मोठी गर्दी होते.येथे जगद्गुरू तुकाराम महाराजांचे गुरु श्री बाबाजी चैतन्य महाराज संजीवन समाधी आहे.या समाधीचेही भाविकांना कपर्दिकेश्वर यात्रे निमित्ताने दर्शन घेता आले.ओतूर भूषण पुरस्काराचे वितरण दुपारी करण्यात आले हा पुरस्कार श्रीमान पांडुरंग नानाभाऊ डुंबरे यांना आमदार अतुल बेनके,माजी आमदार शरददादा सोनवणे,पुणे म.न.पा.चे नगरसेवक विशाल तांबे तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त श्री कपर्दिकेश्वर मंदिराच्या मार्गावर मोठी यात्रा भरते.या यात्रेत आलेल्या आकाशी पाळणे,मेरी गो राऊंड,मौत का कुआ यासारख्या विविध खेळण्यांचा यात्रा शौकिनांना आनंद घेतला.तर यात्रेत येणाऱ्या खाऊच्या विविध दुकानांमध्ये खवय्यांनी ताव मारला.चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त भरविण्यात आलेल्या कुस्त्यांच्या जंगी आखाड्यात संपूर्ण महाराष्ट्रातून येणारे नामवंत मल्ल हजेरी लावत असतात.ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या ओतुरच्या आखाड्यात नामवंत मल्लांच्या कुस्त्या चांगल्याच रंगतदार झाल्या.अनुचीत प्रकार घडू नये म्हणून ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

# अल्पवयीन मुलीची छेड , शाळा प्रशासनाची उदासीनता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

बदलापूर येथील घटना ताजी असतांनाच आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेतील दोन विद्यार्थ्यांनींची छेडछाड झाल्याची पिडीत मुलीच्या वडिलाने आष्टी पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणात पोलिसांना तपास करण्यासाठी आवश्यक असलेला घटना पंचनामा करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ यांना पोलिसांनी विचारले असता त्यांनी या प्रकरणी माझा काही संबंध नाही, ही घटना शाळेत घडली नाही, सदरील घटना शाळेच्या आवारात घडली नसल्याने आमचा संबंध काय? अशी उडवाउडवीची उत्तरे दिली त्यामुळे जर तपास कामात शाळेचे मुख्याध्यापकाची उदासीनता दिसत असेल तर पोलिस तपास कसा करणार? जर हे प्रकरण एवढे मोठे असून,शाळेचे मुख्याध्यापक, विद्यार्थीनीचे पालक यांना

**माझा काहि संबंध नाही..!**

**याबाबत पत्रकारांनी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ यांना तपास कामासाठी पोलिसांना पंच म्हणून का? गेले नाहीत असे विचारले असता या प्रकरणी माझा काही संबंध नाही, ही घटना शाळेत घडली नाही, सदरील घटना शाळेच्या आवारात घडली नसल्याने आमचा संबंध काय?असे उडवा-उडवी चे उत्तरे देऊन वेळ मारून नेली.**



कसलेच गांभिर्य नसल्याने आरोपी कसा पकडणार? पुन्हा घटना घडल्यातर पोलिसांना दोष देण्यास नागरीक तयारच असतात. या घटनेचे वरिष्ठांनी गांभीर्य लक्षात घेऊन कारवाई करण्याची गरज आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, आष्टी शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशाला शाळा असून या ठिकाणी शहरासह तालुक्यातील हजारो मुली शिक्षण घेत आहेत. सदरील शाळा सुटल्यानंतर शुक्रवार दुपारी चार वाजता खडकत रोडवरील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या दोन मुलींना अडवून त्यांची छेड काढण्याचा प्रकार घडला आहे. सदरीलमुलगी घाबरलेल्या अवस्थेत पुन्हा शाळेत जाऊन घडलेला प्रकार मुख्याध्यापकांना सांगितला.शाळेचे मुख्याध्यापक यांनी संबंधित पालकांना बोलून पोलीस स्टेशन गाठत संपूर्ण हकीगत सांगतली. याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी या आरोपी खडकत रोडवरील सिटी सीसीटीव्ही कॅमेरात प्रकार कैद झाला व त्याची ओळखही पोलिसांना पटली आहे. पण आता पोलिसांना या तपास कामासाठी सरकारी पंच म्हणून शाळेचे मुख्याध्यापक, पिडित मुलींचे पालक व काहि घटनास्थळावरील व्यक्ती असे लागतात. पालकांनी व नागरीक पंच झाले पण सरकारी पंच म्हणून शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब खताळ यांना बोलविले मुख्यध्यापक आबासाहेब खताळ याना बोलविले असता ते उडवा-उडवी चे उत्तरे देऊन आरोपीला पाठिशी घालत तर नाहीत अशी चर्चा सुरू आहे. यातील आरोपी फरार असून त्याला पकडण्यासाठी पथक रवाना केले असल्याची माहिती तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक शिंदे यांनी दिली.

# दीनदयाल विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत मुलींना मोफत सायकलचे वाटप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि. बुलढाणा येथे आज सोमवार दि. २६ ऑगस्ट रोजी मानव विकास मिशन अंतर्गत शासनाकडून मोफत मिळणाऱ्या सायकलचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील मुलीना शाळेत येणे जाणे सुलभ व्हावे यासाठी मानव विकास मिशन अंतर्गत मुलीना मोफत बस पास दिली जाते परंतु जा गावांमध्ये बस जात नाहीत त्या मुलींना मोफत सायकल दिली जाते. या योजने अंतर्गत एकुण २९ सायकल ऊपलब्ध झाल्या होत्या, विद्यालयातील मुलींना अधिकाधिक संख्येने सायकल मिळाव्यात यासाठी योजनेचे प्रमुख श्री.एम.के लेकुरवाळे सर यांनी अथक परिश्रम घेतले.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक तथा विद्यालयाचे पालक संचालक श्री.बाबासाहेब मिनासे, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री.त्र्यंबकराव जायभाये काका,श्री. भगवानराव कायंदे,श्री.देविदासजी बोबडे, श्री.धर्मराज हनुमंते,दै.तरुण भारतचे पत्रकार श्री.सूरजजी गुप्ता,दै.सामानाचे श्री.राजेशजी खांडेभराड,प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर,पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर आदी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक- प्राध्यापिका,शिक्षक - शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी सहकार्य केले. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारीरिक शिक्षक श्री.आर.एल.राठोड यांनी केले.

# आज आष्टीत रंगणार महादहीहंडी उत्सव

## मोठ्या संख्येने उपस्थित रहा-युवा नेते जयदत्त धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी शहरात आज गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या भव्य दहीहंडी महोत्सवास आष्टीसह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवानेते जयदत्त सुरेश धस यांनी केले आहे.



आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात गुरूवार दिनांक २८ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता युवा नेते जयदत्त धस मित्र मंडळाच्यावतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवासाठी माजीमंत्री सुरेश धस यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री लावण्यतारका मानसी नाईक, सिने अभिनेत्री सई मांजरेकर, झेबा शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.तर या महोत्सवामध्ये डीजेच्या तालावर तरुणाई फिरकणारा असून निशा कुसेकर ही प्रसिद्ध सूत्रसंचालिका या महोत्सवाचे सूत्रसंचलन करणार आहे.तर या दहीहंडी उत्सवाचे इव्हेंट बीड येथील सुप्रसिद्ध ड्रीमलँड चे रविराज जेधे हे करणार आहेत.दहीहंडी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून आष्टी शहरात होणाऱ्या या दहीहंडी महोत्सवास आष्टी तसेच तालुक्यातील नागरीकांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवण्याचे आवाहन युवानेते जयदत्त धस यांनी केले आहे.







हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904